प्रेस नोट दिनांक २७/०९/२०१९

| | |
|---|---|
| अेसीबी | रत्नागिरी युनिट |
| आरोपी लोकसेवक | १) श्री.उल्हास नारायण कदम, निवृत्त नायब तहसीलदार, सध्या मानधन तत्वावर कार्यरत सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी(भुसंपादन) तालुका चिपळुण यांचे कार्यालय, ता. चिपळुण, जि. रत्नागिरी. |
| घटनेचे ठिकाण | सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी(भुसंपादन)यांचे कार्यालय, अल्पबचत भवन, ता. चिपळुण, जि. रत्नागिरी. |
| मागितलेली लाचेची रक्कम | २०,०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | तडजोडअंती स्विकारलेली लाचेची रक्कम १९,०००/- रुपये |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांचे पत्नीची घरटवाडी तर्फे वेलदुर ता. गुहागर, जि. रत्नागिरी येथे जमिन आहे. सदर जमिनीतुन भारत सरकार यांस सार्वजनिक हिताचे दृष्टीने नैसर्गिक गॅस वाहतुक करणेसाठी पाईपलाईन टाकणे आवश्यक असल्यासबाबत त्यांना लेखी कळविण्यात आले होते. सदर कामकाजाचा पाठपुरावा करणेसाठी तक्रारदार हे आरोपीत यांचे कार्यालयात जात होते. त्यावेळी आरोपीत लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे त्यानां शासनाकडुन मिळणारी नुकसान भरपाईच्या मोबदल्याची रक्कम अंदाजे रू. ९,००,०००/- यांचे बदल्यात त्यांना रू. २०,०००/-दयावे लागतील असे सांगुन लाचेची मागणी केली. म्हणुन तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. कदम यांचेविरूध्द लाचेच्या मागणीची तक्रार दिनांक २०/०९/२०१९ रोजी दिलेली आहे.<br><br>सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक २७/०९/२०१९ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई मध्ये श्री. उल्हास कदम, निवृत्त नायब तहसीलदार, सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी(भुसंपादन) तालुका चिपळुण यांचे कार्यालय, ता. चिपळुण, जि. रत्नागिरी. यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या नुकसान भरपाईच्या मोबदल्याची शासनाची ऑर्डर देणेकरीता प्रथम २०,०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती १९,०००/-रुपये लाचेची मागणी केल्याचे व ती स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.<br><br>पडताळणीमध्ये निष्पन्न झालेनुसार लागलीच सापळा आयोजित केला असता, लोकसेवक श्री. उल्हास कदम, निवृत्त नायब तहसीलदार, सध्या मानधन तत्वावर कार्यरत सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी(भुसंपादन) ता. चिपळुण, जि. रत्नागिरी यांनी तक्रारदार यांचेकडुन १९,०००/-रुपये लाचेची मागणी करून, मागणी केलेली लाच रक्कम तक्रारदार यांचेकडुन स्विकारल्यानंतर त्यांना दिनांक २७/०९/२०१९ रोजी १६.१४ वा. सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी(भुसंपादन) यांचे कार्यालय, अल्पबचत भवन, ता. चिपळुण यांचे कार्यालय येथे पंचासमक्ष रंगेहात पकडण्यात आले आहे. |

अॅन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्याचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयाशी खालील कमाकावर संपर्क साधावा

Toll Free No :- 1064
Telephone No :- 02352/222893
Office email :- dyspacbratnagiri@mahapolice.gov.in
Website :- www.acbmaharastra.gov.in
Mobile App :- www.acbmaharastra.net
Facebook Page :- www.facebook.com/MaharastraACB

Dy. Supdt. of Anti Corruption Bureau
सत्यमेव जयते

27/9/19
(प्रविण कदम)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी